# कुहू! कुहू!

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**कुहू! कुहू!**
ना. सी. फडके

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
ना. सी. फडके

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३१०/-

# कुहू! कुहू!

# १

मागून येणाऱ्या भल्या मोठ्या ट्रकचा हॉर्न पों पों करून वाजलेला ऐकल्याबरोबर हातात हात घालून एकमेकींशी बोलत चाललेल्या त्या दोन मुली दचकल्या, घाबरल्या, एकदम धाव घेऊन फूटपाथवरच्या गर्दीत घुसल्या.

ट्रकच्या ड्रायव्हरनं त्यांच्याकडं रागानं बघून 'आणली होतीत अपघाताची वेळ! जरा बघून चला! बघून चला!' असं काहीसं म्हटलं.

त्या दोघी मुली मात्र कशी झाली मजा अशा अर्थानं हसल्या. गर्दीतून वाट काढीत चालू लागल्या. मधल्या या व्यत्ययामुळे त्या दोघीतलं जे बोलणं तुटलं होतं ते त्यांनी पुन्हा सुरू केलं...जणू या घटकेला जगातला सगळ्यात महत्त्वाचा विषय तो होता. त्याबद्दलचा निर्णय घ्यायलाच हवा होता...आपल्या संभाषणात त्या इतक्या गढून गेल्या होत्या की भोवतालच्या गर्दीचं आणि रहदारीचं त्यांना भान नव्हतं.

दादरच्या बाजारातील रविवारच्या सकाळच्या प्रहराची गर्दी होती ती. दुतर्फाच्या दुकानादुकानात गिऱ्हाइकं शिरत होती, बाहेर पडत होती. दुकानांच्या बाहेरच्या बाजूस सापडेल तेवढ्या अरुंद जागेत थाटलेल्या छोट्या छोट्या स्टॉल्सवरही टॉवेल, गंजीफ्रॉक, हातरुमाल, रिबना, कचकड्याची खेळणी, कंगवे, पिना अशा वस्तूंची खरेदी-विक्री चालू होती. एक पोर बापाच्या खांद्यावर, तान्हं पोर आईच्या कडेवर दोन मोठी पोरं हात धरून चाललेली, नवरा-बायकोच्या दोघांच्याही हातात मळकट पिशव्या किंवा नव्या निघालेल्या प्लॅस्टिकच्या टोपल्या, अशा थाटात कित्येक मध्यमवर्गीय कुटुंबं रविवार सकाळचा बाजार करण्यासाठी म्हणून निघाली होती आणि रेंगाळत चालली होती. आईच्या कडेवरचं पोर मध्येच रडत होतं, बापाच्या खांद्यावरचं पोर खाली उतरून चालण्याचा हट्ट करीत होतं, बोट धरून चालणारी दोन पोरं मध्येच बोट सोडून मागं रेंगाळत होती, एखाद्या स्टॉलवर मांडलेल्या खेळण्यांकडे आशाळभूत नजरेनं बघत होती, 'कुठे गेला दिग्या?' 'अगं वच्छे, पाय उचल! काय मेलीचा त्रास!' असे उद्गार

माता-पितरांच्या तोंडून निघत होते....मध्यमवर्गीय लोकांच्या जीवनाच्या एका अंगाचं प्रदर्शनच भरलं होतं त्या रस्त्यात. माणसांचा कलकलाट आणि वाहनांचे आवाज वातावरणात भरून राहिले होते. त्यातच कोपऱ्यावरच्या चित्रपटगृहाच्या बाहेरच्या बाजूस तिकिटासाठी ताटकळत उभ्या राहिलेल्या लोकांची भली मोठी रांग दिसत होती, आणि दूरध्वनिक्षेपकावर चालू असलेल्या चित्रपटगीतांचे सहज मैलभर ऐकू जातील असे स्वर हवेत तरंगत होते...बाजारपेठेतल्या पाच-सहा उडुपी हॉटेलात भज्यांचा घाणा चालू होता. त्यांचा तळकट मसालेदार दरवळ जिकडे तिकडे सुटला होता....रस्त्यातून धाव घेऊन फूटपाथवरून चालू लागलेल्या त्या दोन मुलींत जो अत्यंत महत्त्वाचा विषय चर्चिला जात होता तो दुसरा कोणताही नसून हॉटेलातल्या भज्यांचाच होता....

या दोघी मुली सुमारे तेरा वर्षांच्या दिसत होत्या. राखी रंगाच्या कापडाचा परकर आणि तसल्याच कापडाचं पोलकं असा दोघींचा वेश होता. दोघी अनवाणी होत्या. दोघींच्या हातात साध्या काचेच्या दोन दोन बांगड्या होत्या. गळ्यात कापडी पट्टे होते त्यावर तांबड्या अलवाणाची अक्षरं शिवलेली होती, 'चिमणबाग अनाथाश्रम.' दोघींच्याही हातात छोट्या छोट्या सीलबंद पेट्या होत्या. आश्रमासाठी मदत मागण्याकरिता प्रत्येक रविवारी सकाळी आश्रमातल्या मुलींची रवानगी करण्यात येत असे. वेगवेगळ्या मोहोल्ल्यातल्या दुकानादुकानात व चाळीचाळीत या मुली फिरत असत, आणि 'चिमणबागे' साठी फंड गोळा करीत असत. या दोन मुली त्यापैकीच होत्या...आणि या घटकेला त्यांच्यात प्रश्न चर्चिला जात होता तो हा की, एखाद्या हॉटेलात शिरून भजी खायची की नाही?...

''चल की गं नमे. असं काय करतेस?''

''नको गं बाई नको.''

''भजी खावीशी तुला नाही वाटत? खरं सांग.''

''अगं, वाटतं पुष्कळ. पण नको बाई. भीती वाटते.''

''अगं, मी आहे ना बरोबर? भितेस कशाला? चल. फार इच्छा झाली आहे. खाऊ या पोटभर भजी.''

''आज तुला काहीतरी झालंय खचित अबू-''

नर्मदेच्या त्या उद्गारावर अबोली काही बोलली नाही. फक्त स्वत:शीच विचित्र हसली....तिच्या मनात आलं, मला आज खरोखरच काही झालंय. एरव्ही हॉटेलात जाऊन भजी खाण्याचा बेत मी केला नसता....किंवा मघाशी त्या

कापडाच्या मोठ्या दुकानात आणि नंतर पुन्हा त्या स्टेशनरीच्या दुकानात जे मी केलं ते केलं नसतं....

अबोली आणि नर्मदा कापडाच्या त्या मोठ्या दुकानात शिरल्या होत्या. जे गृहस्थ दुकानाचे मालक असावेत असं त्यांना वाटलं होतं त्यांच्यापुढे पेट्या करून त्यांनी मदत मागितली होती. ते गृहस्थ म्हणाले होते, ''जा जा! हल्ली असल्या भिकाऱ्यांचा फार सुळसुळाट झाला आहे. कुणीही कसल्याही नावाचा एक पट्टा गळ्यात अडकवावा, कुलूप घातलेलं लाकडी खोकं हातात घ्यावं, आणि प्रतिष्ठितपणे भीक मागावी. काही मिळायचं नाही. जा!''....त्यांच्या नकाराचं अबोलीला फारसं वाईट वाटलं नव्हतं. कुणी पेटीत रुपया आठ आणे टाकीत असत, कुणी नाही म्हणत. या दोन्ही गोष्टींची इतर मुलींप्रमाणेच अबोलीला सवय झाली होती. पण त्या गृहस्थांनी आपल्याला, 'भिकारी' ठरवलेलं बघून अबोलीला अत्यंत दु:ख झालं होतं...आश्रमाविषयीची जी अप्रीती तिच्या मनात आताशा उद्‌भवू लागली होती ती त्या गृहस्थांच्या तोंडच्या 'भीक' शब्दानं एकदम उचंबळून आली...लोकांच्या मदतीवर चालणाऱ्या आश्रमातील एक मुलगी होती ती! भिकारीच नव्हे तर काय? आश्रमासाठी मदत द्या म्हणून पेटी पुढे करायची, तोंड वेंगाडायचं, म्हणजे भीक मागण्याचाच एक प्रकार नव्हता काय?.....

अंत:करणाला झालेली जखम मोठ्या प्रयत्नानं सहन करून अबोलीनं धिटाई करून त्या गृहस्थाकडे आपल्या पाणीदार, मोठ्या डोळ्यांची नजर लावली आणि म्हटलं, ''आम्ही भीक नाही मागत. एका चांगल्या संस्थेला मदत मागतो. हे पत्रक वाचा.'' तिनं पिशवीतलं एक छापील पत्रक काढून त्यांच्यापुढे धरलं...तिची खात्री होती की ते पत्रक वाचल्यावर दुकानाच्या मालकांचं मत पालटेल. त्या पत्रकाखाली दयाभाई कोतवाल व त्यांची पत्नी चारुबेन यांच्या सह्या होत्या. या दोन्ही माणसांना समाजात मोठी प्रतिष्ठा होती. 'चिमणबाग' नावाचा जो छोटासा आश्रम त्यांनी चालविला होता त्याचा लौकिक मोठा होता...

अबोलीचा तर्क खरा ठरला.

मालकांनी दोन रुपये पेटीत टाकले होते.

वास्तविक अबोलीचं आणि नर्मदेचं काम झाल्यावर त्या दोघींनी दुकानाबाहेर पडायला हवं होतं. नमू एक पायरी उतरून गेलीही होती. पण अबोलीनं तिला परत बोलाविलं होतं. पुन्हा पायरी चढून दुकानात येता येता नमूनं तिला विचारलं होतं,

''काय गं?'' अबोली तिला म्हणाली होती, ''थोडं काम आहे माझं.'' तिचं काय काम असावं याचा नर्मदेला तर्क करता येईना. परंतु ती तिच्याजवळ गेली. अबोली तिच्या कानात म्हणाली, ''साड्या बघू या.'' अत्यंत आश्चर्यानं नर्मदेनं तोंडावर हात ठेवला आणि ती पुटपुटली, ''आपल्याला थोड्याच घ्यायच्या आहेत?'' अबोली डोळे मिचकावून म्हणाली, ''अगं, पण बघायला काय हरकत आहे?'' तिनं नर्मदेला ओढलंच, आणि ती काऊंटरपाशी जाऊन म्हणाली, ''साड्या दाखविता का?'' दुकानातल्या नोकरानं तिच्याकडे काहीशा अविश्वासानंच बघितलं, परंतु त्यानं साड्यांचा एक गठ्ठा काढला आणि टेबलावर आदळला...एकेक साडी उलगडून तिचा पोत चाचपून बघत, किनार चांगली की वाईट याबद्दल नर्मदेशी चर्चा करीत, अबोलीनं साड्यांच्या किमतीदेखील विचारल्या. तिला घ्यायचं नव्हतं काहीच, परंतु चौकशी करण्यात, एखाद्या विशेष तलम साडीचा पदर अंगावर घेऊन पाहण्यात, साडीची घडी कमरेपाशी धरून तिची पट्टीदार किनार आपल्या पावलाशी रुळताना पाहण्यात, आणि अशी एखादी साडी आपण नेसली तर आपण किती शोभून दिसू त्याची कल्पना करण्यात मोठं सुख होतं...हे सुख तिनं भरपूर घेतलं....आश्रमात नेसायला मिळणाऱ्या राखी रंगाच्या कापडाच्या परकर- पोलक्याचा तिला वीट आला होता. बाहेरच्या जगात हिंडताना तिच्या वयाच्या कितीतरी मुली चांगली चांगली वस्त्रं नेसून हिंडताना तिनं पाहिल्या होत्या. आश्रमात तिला पोटभर खायला मिळत होतं. अंगभर कपडा मिळत होता. परंतु त्यात जो सामान्यपणा आणि तोचतोचपणा होता त्याचा तिला विलक्षण कंटाळा आला होता. चांगलं खावं, चांगलं नेसावं, अशी तिच्या मनाची ओढ होती....

तिनं वीस-पंचवीस साड्या बघितल्या. तिची नजर नायलॉनच्या साड्यांकडे जात होती. त्या अंगावर घेऊन पाहाव्यासं तिला वाटत होतं, पण 'त्या दाखवा हो जरा' असं म्हणण्याचं धाडस तिला झालं नाही. दुकानातला तो नोकर आधीच चमत्कारिक चेहरा करून तिच्याकडे बघत होता. भारी किमतीच्या साड्या बघू या म्हटलं तर तो अपमानाचं काहीतरी बोलेल अशी तिला भीती वाटली. तिनं काऊंटरवरच्या साध्या सुती साड्यांचा गठ्ठा दूर केला, आणि नर्मदेला म्हटलं, ''चल. जाऊ या.'' साड्या दाखविणारा तो नोकर कुत्सितपणे हसून म्हणाला, ''का हो? घ्यायचं नाही का काही?'' तिनं अगदी रुबाबात उत्तर दिलं, ''पुन्हा येऊ केव्हा तरी''... तिनं जे सुख फुकटात मिळवलं होतं ती तिला पुरेसं होतं. ते दुकानाबाहेर पडली ती अगदी खुशीत, हसत...

नंतर एका मोठ्या स्टेशनरीच्या दुकानात तिनं असाच प्रकार केला होता. दुकानाचा मालक महाराष्ट्रीय नव्हता. गुजराथी होता. पत्रकावरची दयाभाई कोतवाल आणि चारुबेन ही नावं त्याच्या परिचयाची असावीत. त्यानं चटकन् पाच रुपयांची एक नोट पेटीत टाकली, आणि अबोली व नर्मदा यांच्याकडे बघून तो म्हणाला, ''आव जो.'' नर्मदा दुकानातून खाली उतरू लागली, परंतु अबोलीनं तिला ओढून म्हटलं, ''थांब गं.'' दुकानाच्या आतल्या बाजूस नर्मदेला घेऊन जाऊन तिथल्या नोकराला ती म्हणाली, ''चांगली फाऊंटनपेनं आहेत का हो तुमच्याकडे?'' कापडाच्या दुकानातल्या नोकराप्रमाणे इथल्या गुजराथी नोकरानं अविश्वासाची चर्या केली नाही. स्वस्त किमतीचा माल तर त्यांना दाखविलाच, पण शिवाय भारी किमतीची पेनं देखील त्यांच्यापुढे ठेवली. कितीतरी पेनं शाईत बुडवून अक्षर कसं येतं ते बघण्यासाठी अबोलीनं आणि नर्मदेनं दोघींनीही कागदावर आपापल्या सह्या ठोकल्या. 'अबोली अंबेशीकर' 'नर्मदा नेने.' मग अबोलीनं केसाला लावण्याच्या सुगंधी तेलाच्या बाटल्या पाहायला मागितल्या, कंगवे आहेत का विचारलं, आरशांचे वेगवेगळे नमुने बघितले, सुती रेशमी हातरुमाल पाहिले. तिला घ्यायचं नव्हतं काहीच, पण या साऱ्या वस्तू तिनं कल्पनेनं खरेदी केल्या. उंची सुवासिक तेलानं आपले लांबसडक केस चोपडले, सुंदर कंगव्यानं विंचरून विंचरून रेशमाच्या लडीसारखे केले, वाटोळ्या बिलोरी आरशात आपलं रूप न्याहाळून घेतलं. चिमणबागेत राहणाऱ्या मुलींना आरशावाचून वेणीफणी करावी लागत असे. आरसा ही चैनीची वस्तू होती. गरजेची नव्हती. स्वत:च्या चेहऱ्याचं प्रतिबिंब आरशात पाहण्याची संधी अबोलीला कधी मिळत नव्हती...आता तिनं त्या सुखाचा भरपूर उपभोग घेतला. दुकानातल्या मनुष्यानं तिला घेऊ दिला....

आणि आता अबोली म्हणत होती, हॉटेलात जाऊ या, भजी खाऊ या.

नर्मदा म्हणाली, ''आज तुला काहीतरी झालंय खचित, अबू.''

नर्मदेच्या या उद्‌गारावर अबोली काही बोलली नाही. फक्त स्वत:शीच हसली. तिच्या मनात आलं, मला आज खरोखरच काहीतरी झालंय...काय झालं होतं ते तिला कळत होतं. नर्मदेला सांगावंसंही वाटत होतं....

आश्रमात ज्या गोष्टी मिळत नव्हत्या, करता येत नव्हत्या त्या मिळवाव्या, कराव्या असं तिला गेल्या कित्येक दिवसांपासून वाटत होतं. नमू म्हणजे तिची सगळ्यांत जिवलग मैत्रीण होती. परंतु तिचा स्वभाव वेगळा होता, इतिहास वेगळा होता. आश्रमातल्या मुलींचे दोन प्रकार होते. काही मुली अगदी बालपणापासून

आश्रमातच वाढलेल्या होत्या. 'घर' म्हणजे काय वस्तू असते हे त्यांना कधी माहीतच नव्हतं. आई-बापाचं सुख त्यांच्या वाट्याला कधी आलंच नव्हतं. नमू अशा मुलींपैकी होती. शिवाय तिचा स्वभाव शांत, साधा, अल्पसंतोषी होता. अबोलीची गोष्ट वेगळी होती. इतर चार-सहा मुलींप्रमाणे ती उशिरा आश्रमात दाखल झाली होती. त्यापूर्वी गृहसौख्य, आई-बापांची ममता, त्यांनी केलेले परोपरीचे लाड या गोष्टींचा अनुभव तिनं दहा वर्षं घेतला होता. आईची माया कशी असते ते तिला ठाऊक होतं. बापाचं प्रेम तिला लाभलं होतं. तिची आई वारली तेव्हा ती फक्त आठ वर्षांची होती. परंतु आईनं तिचे सर्व प्रकारचे लाड केले होते, हट्ट पुरविले होते. तिच्या बापानं तर तिला अगदी तळहातावरच्या फोडाप्रमाणे वागविलं होतं. ती अगदी लहान होती तेव्हापासूनच तिला कळू लागलं होतं की आपला बाप असा तसा कुणी सामान्य मनुष्य नव्हता, तर एक अत्यंत लोकप्रिय नामांकित गायक नट होता. त्याचं गोव्यातलं जन्मगाव अंबेशी, त्या गावाच्या गोष्टी तो तिला सांगत असे. ''आपण सगळीच जाऊ एकदा अंबेशीला हं'' असं वारंवार म्हणत असे...तो तिच्या आईला आणि तिला अंबेशीला घेऊन गेला तेव्हा ती सात वर्षांची होती. त्या सफरीच्या कितीक आठवणी अबोलीच्या मनात अजूनही ताज्या होत्या.

आगगाडीच्या प्रवासात ती सारखी खिडकीशी बसून राहिली होती. रात्रीदेखील डोळे अगदी झोपेनं मिटूच लागले तेव्हा अंथरुणावर पडली होती. सकाळी ती जागी झाली तेव्हा कॅसल रॉक स्टेशनावरची गडबड-धांदल तिला दिसली होती. त्यांच्या डब्यातल्या बॅगा, वळकट्या साहेबांसारखा पोषाख केलेल्या लोकांनी बाहेर काढल्या आणि नेल्या तेव्हा आपल्या बापानं त्यांना अडवलं नाही याचं आश्चर्य तिला वाटलं होतं. तिच्या बापानं तिला सांगितलं होतं, ''या स्टेशनावर तपासणी असते सामानाची. आपण आता गोव्याच्या हद्दीत शिरत आहोत ना म्हणून.'' तिला त्याचा अर्थ कळला नव्हता. तिला वाटलं होतं, घमेल्यासारख्या कडक टोप्या घातलेले ते साहेब आता कसचं परत देतात आपलं सामान. एका बॅगेत तिचे सफरीसाठी मुद्दाम शिवलेले कपडे होते. किल्ली दिली की उड्या मारणारं अस्वल, उंदरामागे वाटोळं फिरणारं मांजर, खांबावर चढणारं उतरणारं माकड, अशी गमतीदार खेळणी होती. गेले आपले कपडे आणि खेळणी अशा शंकेनं येणारं रडू आवरणं तिला कठीण झालं होतं. ''अगं येतंय परत आपलं सामान'' हे बापाचे शब्द तिला खरे वाटत नव्हते. फरशीवर खाड खाड बूट